Gramsetoo

# माझा शेती संकल्प स्पर्धा 2025

## MAJHA SHETI SANKALP



तिफण फाउंडेशन

# स्पर्धेची उद्दिष्टे:

Gramsetoo

- शेतकऱ्यांना खरीप हंगामाच्या तयारीसाठी प्रोत्साहीत  करणे.
- पूर्वमशागत, खत व्यवस्थापन, माती परीक्षण, जीवाणूसंघ बीज प्रक्रिया इत्यादींसाठी जागरूकता वाढवणे.
- शेतकऱ्यांमध्ये परस्पर शिकण्याची संस्कृती निर्माण करणे.
- ग्रामसेतू ॲपच्या माध्यमातून शेती तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार करणे.





# स्पर्धेचा कालावधी

📅 स्पर्धेची सुरुवात: 18 एप्रिल 2025

🏁 सहभाग शेवटची तारीख: 15 जुन 2025

📅 माझा शेती संकल्प प्रमाणे कृती करताना ३ फोटो अपलोड करण्याची अंतिम तारीख: 15 जुलै 2025

🏁 क्षेत्रीय पाहणी करुन विजेते अंतिम करणे : 16 - 25 जुलै 2025

🏆 निकाल जाहीर होण्याची वेळ: 25 जुलै 2025



# स्पर्धेचे स्वरुप:

- ही एक ऑनलाईन शेती स्पर्धा आहे, जिथे शेतकऱ्यांना त्यांच्या खरीप हंगामाच्या तयारीचे व प्रत्यक्ष केलेल्या कृतीचे फोटो, व्हिडीओ आणि मजकूर स्वरूपात पोस्ट करायचे आहेत.

# सहभाग कसा घ्यावा?

- 📌 ग्रामसेतू ॲप डाउनलोड करा.
- 📌 तुमच्या माझा शेती संकल्प '+' बटणावर क्लिक करून पोस्ट करा.
- 📌 पोस्ट शेअर करा आणि जास्त लाईक्स मिळवा.
- 📌 संकल्पातील गोष्टी राबवल्यास त्याचे फोटो पोस्ट मध्ये My story मधुन अपडेट करा.
- 📌 शेतकरी मित्रांना आमंत्रित करून त्यांना खरीप हंगाम संकल्प करण्यास  प्रोत्साहित करा.






# स्पर्धेतील सहभागी होण्याची प्रक्रिया:

**१. GramSetoo ॲप डाउनलोड करा:**

आपल्या मोबाईलवर GramSetoo हे ॲप Google Play Store वरून डाउनलोड व इन्स्टॉल करा.

**२. ॲप मध्ये नोंदणी (Registration) करा:**

ॲप उघडल्यानंतर आपले नाव, मोबाईल नंबर व इतर आवश्यक माहिती भरून नोंदणी पूर्ण करा.

**३. '+' बटणावर क्लिक करा:**

ॲप मध्ये प्रवेश केल्यानंतर मुख्य स्क्रीनवर दिसणाऱ्या '+' (प्लस) बटणावर क्लिक करा.

**४. आपला शेती संकल्प लिहा:**

उघडलेल्या पोस्टमध्ये आपण आपल्या खरीप हंगाम 2025 साठीचे नियोजन लिहा.

(संकल्प कसा लिहावा कोणत्या गोष्टी टाळाव्यात इत्यादी माहिती पुढील पानावर दिलेली आहे)

# स्पर्धेतील सहभागी होण्याची प्रक्रिया:

Gramsetoo

**५. पोस्ट सबमिट करा:**

संकल्प लिहून झाल्यावर तो पोस्ट स्वरूपात सबमिट करा.

**६. संकल्पावर कृती करा:**

ज्या गोष्टी संकल्पामध्ये लिहिल्या आहेत, त्यातील किमान तीन बाबी खरीप हंगामात प्रत्यक्ष कृतीत आणा.

**७. फोटो व व्हिडिओ अपडेट करा:**

कृती झाल्यानंतर, आपल्या आधीच्या पोस्टमध्ये जाऊन, पोस्ट EDIT करुन फोटो अपलोड करा (जसे लागवड करताना, पिकाची वाढ, प्रयोग करताना इ.) यूट्युब व्हिडीओ लिंक टाका (आपल्या कामाचा लहान व्हिडीओ यूट्युबवर अपलोड करून लिंक द्या.)

# स्पर्धेमध्ये करावयाच्या गोष्टी (उदाहरण )

"माझा शेती संकल्प" स्पर्धेमध्ये करावयाच्या बाबी:

✅ माती परीक्षणानुसार शेती नियोजन – मातीच्या परीक्षणावर आधारित योग्य खत व्यवस्थापन करणे.

✅ बीज प्रक्रिया – जिवाणु संघ, ट्रायकोडर्मा, रायझोबियम यांसारख्या जैविक निविष्ठांचा वापर.

✅ सेंद्रिय निविष्ठांचा वापर – शेणखत, कंपोस्ट, निंबोळी अर्क, जीवामृत, दशपर्णी अर्क यांचा समावेश.

✅ जैवविविधता वाढवणे – आंतरपीक, मिश्रपीक, वाफसा स्थिती राखणे, परागसिंचनास मदत करणाऱ्या वनस्पतींची लागवड.

✅ उत्पादन खर्च कमी करण्यासाठी उपाययोजना – स्थानिक पातळीवरील निविष्ठांचा अधिकाधिक उपयोग.

✅ आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर – ड्रोनद्वारे फवारणी, IoT सेन्सरद्वारे मृदा व हवामान व्यवस्थापन, GIS तंत्रज्ञान.

✅ रसायनमुक्त शेती – नैसर्गिक शेती, झिरो बजेट शेतीचे तंत्रज्ञान स्वीकारणे.

# स्पर्धेमध्ये करावयाच्या गोष्टी (उदाहरण )

Gramsetoo

- ✅बायोचार (Biochar) चा उपयोग- निर्मिती व वापर
- ✅ पाणी व्यवस्थापन – ठिबक सिंचन, वाफसा तंत्रज्ञान, नाडेप कंपोस्टसाठी योग्य ओलावा राखणे.
- ✅ कंपोस्टिंग व सेंद्रिय खतनिर्मिती – नाडेप, व्हर्मी कंपोस्ट, फर्मेन्टेड जैविक खत वापरणे.
- ✅ शेतीत जैविक कीड नियंत्रण उपाय – फेरोमोन ट्रॅप, पक्षीथांबे, निळे/पिवळे चिकट सापळे यांचा उपयोग.
- ✅ स्थानिक बियाणांचे जतन व संवर्धन – पारंपरिक वाणांचे संवर्धन आणि त्यांचा प्रचार.
- ✅ कार्बन क्रेडिटसाठी उपाय – वृक्षलागवड, नैसर्गिक तंत्रांचा अवलंब.
- ✅ फार्म रेकॉर्ड कीपिंग – शेतातील उत्पादन, खर्च व विक्रीची नोंद ठेवणे.
- ✅ नैसर्गिक कीड व रोग व्यवस्थापन – जैविक बुरशीनाशके, फायद्याचे जीवाणू व वनस्पती अर्क वापरणे.
- ✅ शेतीशी निगडीत विविध उपक्रमांचा अवलंब – मधमाशी पालन, फळप्रक्रिया, विपणन धोरणे.

**कोणतेही किमान ३ मुद्दे निवडून त्यांची अंमलबजावणी करावी लागेल.**

# "माझा शेती संकल्प" कसा असावा?

Gramsetoo

1. ✅ व्यवहार्य असावा:
— संकल्प प्रत्यक्षात अंमलात आणता येईल असा असावा. फक्त कल्पनाविलास नको.
2. ✅ कृतीक्षम असावा:
— संकल्पावर आधारित ठोस कृती शक्य असली पाहिजे.
3. ✅ मौल्यवान अनुभवावर आधारित असावा:
— आधीच्या अनुभवातून शिकून वास्तवदर्शी नियोजन करावे.
4. ✅ माती परीक्षणावर आधारित असावा:
— खत आणि पाणी व्यवस्थापन मातीच्या स्थितीला धरून करणे अपेक्षित.
5. ✅ शाश्वत शेतीला प्रोत्साहन देणारा असावा:
— मातीचा पोत जपणारा, निसर्गपूरक व जैवविविधता वाढवणारा संकल्प असावा.
6. ✅ उत्पादन खर्च कमी करण्याचा विचार असावा:
— अत्यावश्यक निविष्ठांचा वापर व अनावश्यक खर्च टाळण्याचा संकल्प असावा.
7. ✅ जैविक निविष्ठा व नैसर्गिक संसाधनांचा वापर असावा:
— शक्य तिथे सेंद्रिय व बायो प्रॉडक्टचा समावेश असावा.

# "माझा शेती संकल्प" कसा असावा?

8. ✅ नवीन तंत्रज्ञानाचा सुजाण वापर असावा:
— मोबाईल अ‌ॅप्स, सोलर पंप, ड्रिप सिंचन यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश.
9. ✅ हवामान बदलाचा विचार करून नियोजन केलेले असावे:
— पाऊस, उष्णता, गारपीट इ. बाबींचा अंदाज घेऊन पीक निवड करावी.
10. ✅ जमिनीच्या आरोग्याचा विचार असावा:
— हरित खत, कंपोस्ट खत वापरून जमिनीची उत्पादकता वाढविण्यावर भर.
11. ✅ पाणी बचतीचा ठोस संकल्प असावा:
— ठिबक सिंचन, जलसंवर्धन यांचा वापर करणे.
12. ✅ समांतर उत्पन्नाच्या स्रोतांचा विचार असावा:
— मधमाशी पालन, भाजीपाला उत्पादन, फळबाग लागवड यासारख्या पूरक उपक्रमांचा समावेश.
13. ✅ सामूहिक शेती किंवा गटशेतीचा विचार असावा:
— शेजारील शेतकऱ्यांशी समन्वय साधून एकत्रित नियोजनाचा संकल्प असावा.
14. ✅ स्वतःच्या ज्ञानात वाढ करण्याचा संकल्प असावा:
— शेती प्रशिक्षण, ऑनलाईन अभ्यासक्रम, कृषी प्रदर्शनाला भेटी देण्याचा संकल्प.
15. ✅ शेतीतील नवसंवेदनशील उपायांचा अवलंब असावा:
— उदाहरणार्थ, बायो चार, वर्मी कंपोस्ट, फेरो ट्रॅप्सचा वापर.

# स्पर्धेमधील संकल्पात हे नको (उदाहरण )

Gramsetoo

- ❌ पराठी (तुरट्या) जाळण्याचा संकल्प करू नये.
- ❌ रासायनिक खते व कीटकनाशकांचा अतिरेक करण्याचा संकल्प करू नये.
- ❌ माती परीक्षण न करता अंदाजाने खत वापरण्याचा संकल्प करू नये.
- ❌ पाणी वाया घालवणाऱ्या पारंपरिक सिंचन पद्धती वापरण्याचा संकल्प करू नये.
- ❌ एकाच पिकावर अवलंबून राहण्याचा संकल्प करू नये (Monocropping टाळा).
- ❌ केवळ उत्पादन वाढवण्याच्या हव्यासापोटी जमिनीची हानी करणारा शेतीचा संकल्प करू नये.
- ❌ जैवविविधता कमी करणाऱ्या पद्धतींचा संकल्प करू नये.
- ❌ जैविक निविष्ठांचा वापर न करता पूर्ण रसायनाधिष्ठित शेतीचा संकल्प करू नये.
- ❌ शेतीतील अवशेष खुलेआम जाळण्याचा किंवा टाकण्याचा संकल्प करू नये.
- ❌ बियाणे निवडताना फक्त ब्रँडवर अवलंबून राहण्याचा संकल्प करू नये; स्थानिक व सुधारित बियाण्याचा विचार करावा.

# स्पर्धेमधील संकल्पात हे नको (उदाहरण )

- ❌ मजुरांवर अन्याय करणाऱ्या पद्धतींचा संकल्प करू नये (मजुरांचे हक्क जपावेत).
- ❌ विना प्रशिक्षण आधुनिक यंत्रसामग्री वापरण्याचा संकल्प करू नये.
- ❌ बिनधास्त कर्ज घेऊन अवाजवी खर्च वाढवण्याचा संकल्प करू नये.
- ❌ शेतीतील अपयशासाठी सतत हवामानाला किंवा नशिबाला दोष देण्याचा संकल्प करू नये; नियोजनावर भर द्यावा.
- ❌ शाश्वत शेतीचे तत्त्व दुर्लक्षित करण्याचा संकल्प करू नये.
- ❌ इतर शेतकऱ्यांशी द्वेषभावनेने वागण्याचा संकल्प करू नये; ज्ञानाची देवाण-घेवाण करावी.
- ❌ स्वतःचा शेती अनुभव न वाढवता केवळ जुन्या पद्धतींचा आग्रह धरण्याचा संकल्प करू नये.
- ❌ ऑनलाईन माध्यमांपासून दूर राहण्याचा संकल्प करू नये.
- ❌ मातीची झीज करणाऱ्या नांगरणी पद्धती सतत वापरण्याचा संकल्प करू नये.
- ❌ सेंद्रिय आणि नैसर्गिक पर्यायांचा अव्हेर करण्याचा संकल्प करू नये.

# स्पर्धेचा संभाव्य परिणाम

Gramsetoo

🌾 रासयनिक निविष्ठांचा कमी वापर करुन सेंद्रिय / नैसर्गिक शेतीस चालना मिळेल.

🚜 शेतकऱ्यांमध्ये खरीप हंगामाच्या तयारीबद्दल जागरूकता वाढेल.

? शेतीतील आधुनिक आणि शास्त्रीय पद्धतींचा प्रचार होईल.

🎥 शेतकऱ्यांचा सहभाग वाढवून त्यांचा सोशल मीडिया प्रभाव वाढेल.

💡 बियाणे प्रक्रिया, माती परीक्षण यासारख्या  महत्त्वाच्या गोष्टींचा अंवलंब करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या वाढेल.

📈 शेतकऱ्यांमध्ये चांगल्या शेती पद्धतींची देवाणघेवाण होऊन उत्पादकता वाढेल.

🌾 रासायनिक खतांची खरीप पुर्व खरेदी वाढेल.

🎥 शेतकऱ्यांचा सहभाग सोशल मीडियात शेअर होईल.





# स्पर्धेचा संभाव्य परिणाम

🤝 शेतकरी एकमेकांच्या अनुभवातून शिकून  त्यांची आर्थिक व उत्पादन क्षमता सुधारेल.

🎯 प्रत्येक भागातील यशस्वी प्रयोग आणि नाविन्यपूर्ण कल्पनांना प्रसिद्धी मिळेल.

💰 सेंद्रिय व नैसर्गिक शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना अधिक संधी आणि नवीन बाजारपेठ मिळू शकते.

🏆 स्पर्धेत सहभागी झालेल्या शेतकऱ्यांना पुढील शेती उपक्रमांसाठी प्रेरणा मिळेल आणि त्यांचा आत्मविश्वास वाढेल.

📊 शासकीय आणि बिगरशासकीय संस्थांसाठी हे एक डेटाबेस बनेल, ज्याद्वारे नाविन्यपूर्ण शेती मॉडेल तयार करता येतील.





# गुणवाटप प्रणाली

- एकूण गुण: १००

लाईक्सवर आधारित गुण (३५ गुण)

१ लाईक = १ गुण

जितक्या जास्त लाईक्स, तितके जास्त गुण मिळतील!

मित्रांना आमंत्रित केल्यास (५ गुण)

१ मित्राला इन्व्हाईट केल्यास = १ गुण

जास्तीत जास्त ५ मित्रांना इन्व्हाईट करून ५ गुण मिळवता येतील.

मित्रांनी खरिपासाठी संकल्प पोस्ट केल्यास (२५ गुण)

१ मित्राने खरीप संकल्प पोस्ट केल्यास = ५ गुण

जास्तीत जास्त ५ मित्रांनी संकल्प लिहिल्यास २५ गुण मिळतील.







# गुणवाटप प्रणाली

खरीप संकल्प प्रमाणे कृती करताना ३ फोटो अपलोड केल्यास (३० गुण)

१ कृतीसाठी = १० गुण, ३ कृतीसाठी ३० गुण मिळतील.

अवलंब केलेल्या कृतींचा व्हिडिओ लिंक अपलोड केल्यास ५ गुण





## 🎯 विजेते निवडण्याची प्रक्रिया

**1. गुणांचे मूल्यमापन:**

स्पर्धेतील प्रत्येक शेतकऱ्याला त्यांच्या संकल्प लेखन, मित्रांना आमंत्रित करणे, मित्रांनी संकल्प लिहिल्यास, कृतीचे फोटो शेअर करणे आणि पोस्टला मिळालेल्या लाईक्स यांच्या आधारे गुण दिले जातील.

**2. सर्वाधिक गुणधारकांची निवड:**

सर्वांत जास्त गुण मिळवलेल्या शेतकऱ्यांची यादी तयार केली जाईल.

**3. क्षेत्रीय प्रत्यक्ष तपासणी (Field Verification):**

निवडलेल्या शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन त्यांच्या संकल्पानुसार खरीप हंगामातील प्रत्यक्ष केलेल्या कृतींची तपासणी केली जाईल.

शेतीतील अंमलबजावणी आणि पोस्ट केलेल्या माहितीची खरीखुरी पडताळणी केली जाईल.

# 🎯 विजेते निवडण्याची प्रक्रिया

Gramsetoo

**4. चुकीचा आढळल्यास बाद:**

तपासणीदरम्यान जर कोणतीही माहिती खोटी, फसवी किंवा दिशाभूल करणारी आढळली तर संबंधित शेतकऱ्याला स्पर्धेतून थेट बाद करण्यात येईल.

**5. अंतिम विजेते जाहीर:**

क्षेत्रीय तपासणीमध्ये खरे आणि योग्य अंमलबजावणी करणाऱ्या सर्वात जास्त गुणधारक शेतकऱ्याला अंतिम विजेता घोषित करण्यात येईल.





# बक्षिसे आणि पुरस्कार- राज्यस्तर

🥇 प्रथम क्रमांक: ₹10000 + स्मृतिचिन्ह + प्रमाणपत्र

सोशल मीडिया प्रमोशन

🥈 द्वितीय क्रमांक: ₹7000 + स्मृतिचिन्ह + प्रमाणपत्र

सोशल मीडिया प्रमोशन

🥉 तृतीय क्रमांक: ₹5000 +स्मृतिचिन्ह + प्रमाणपत्र

सोशल मीडिया प्रमोशन









## अ) बक्षिसे आणि पुरस्कार- जिल्हास्तर

अहिल्यानगर, पुणे, नाशिक, सोलापूर, छ. संभाजीनगर, गडचिरोली, यवतमाळ, अमरावती, जळगाव, सातारा, चंद्रपूर, बीड, नांदेड. (13 जिल्हे)



- प्रथम क्रमांक- 2 : प्रमाणपत्र + सन्मानचिन्ह
- द्वितीय क्रमांक- 2 : प्रमाणपत्र + सन्मानचिन्ह
- तृतीय क्रमांक- 2 : प्रमाणपत्र +सन्मानचिन्ह

## ब) बक्षिसे आणि पुरस्कार- जिल्हास्तर

नागपूर, बुलढाणा, सांगली, रत्नागिरी, जालना, कोल्हापूर, धाराशिव, धुळे, लातूर, रायगड, वर्धा, परभणी, नंदुरबार, गोंदिया, अकोला, पालघर, सिंधुदुर्ग, वाशीम, हिंगोली, ठाणे, भंडारा. (21जिल्हे)

- प्रथम क्रमांक- 1 : प्रमाणपत्र + सन्मानचिन्ह
- द्वितीय क्रमांक- 1 : प्रमाणपत्र + सन्मानचिन्ह
- तृतीय क्रमांक- 1 : प्रमाणपत्र + सन्मानचिन्ह

# क) बक्षिसे आणि पुरस्कार- कृषी विस्तारक

Gramsetoo

**उत्कृष्ठ प्रवर्तक**

प्रत्येक जिल्ह्यातून त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्वाधिक शेतकरी सहभागी/ नोंदणी करणाऱ्या कृषी विभागातील अधिकारी, कर्मचारी यांना सन्मानचिन्ह + प्रमाणपत्र

**बक्षीसे संख्या व रक्कमेत वाढ होऊ शकते. बक्षीस संख्या व रक्कमेत वाढ झाल्यास त्याची माहिती ग्राम सेतूॲप व सोशल मीडियातून कळविण्यात येईल.**





# विजेत्यांची ओळख आणि पुढील संधी

➡️ विजेते घोषित केल्यानंतर, त्यांचे अनुभव ग्रामसेतू/ब्लॉग/सोशल मीडिया वर प्रसिद्ध करणे.

➡️ टॉप विजेत्यांना ग्रामसेतू अ‍ॅपमध्ये "स्मार्ट शेतकरी  मेंटॉर" म्हणून स्थान देणे, जेणेकरून ते इतरांनामार्गदर्शन करू शकतील.

➡️ विजेत्यांचा विशेष व्हिडिओ तयार करून त्यांना डिजिटल प्रसिद्धी

📢 टॉप 10 पोस्ट तिफन फाउंडेशन अधिकृत च्या  सोशल   मीडियावर शेअर

🎙️स्पर्धेतील विजेते शेतकरी पुढील वेबिनारसाठी स्पीकर म्हणून आमंत्रित

📢स्पर्धेतील विजेते शेतकरी यांच्या शेतातील खरीप नियोजनाचे परिणाम सोशल मीडियावर शेअर





# माझा शेती संकल्प (उदाहरण)

**शेतीचा तपशील:**

- शेताचे क्षेत्रफळ: _____ एकर
- मातीचा प्रकार: _____ (काळी/तांबडी/वालुकामय इ.)
- पाण्याचा स्रोत: _____ (बोरवेल, विहीर, कालवा, पावसाचे पाणी)



**येणाऱ्या खरीप हंगामातील पीक नियोजन:**

- प्रमुख पीक: _____
- पूरक पीक (आंतरपीक): _____
- पिकासाठी निवडलेली वाणे: _____
- पेरणी/लागवडीची अंदाजे तारीख: _____
- पिकाचा कालावधी: _____ दिवस



**खरीप तयारीसाठी माझी योजना:**

- नांगरणी व मशागत: _____ (तारीख आणि साधने)
- माती परीक्षण: _____ (कधी व कोठे करणार?)
- सेंद्रिय/रासायनिक खत व्यवस्थापन: _____ (खताचे प्रकार व प्रमाण)
- बियाणे प्रक्रिया: _____ (कोणत्या प्रकारची प्रक्रिया करणार?उदा- बायोला )
- पाणी व्यवस्थापन: _____ (ठिबक सिंचन/पाटसिंचन/पावसावर अवलंबून)
- कीड व रोग व्यवस्थापन: _____ (पूर्व नियोजन व उपाय)

# 🌱माझा शेती संकल्प (उदा.) 🌱

**शेतीसाठी अपेक्षित खर्च आणि निधी:**

💰 एकूण अंदाजे खर्च: ₹_____

📌 महत्त्वाचे खर्च:

- बियाणे: ₹_____
- खते: ₹_____
- मशागत व यंत्रसामग्री: ₹_____
- सिंचन व पाणी व्यवस्थापन: ₹_____
- कीड व रोगनियंत्रण: ₹_____
- मजुरी: ₹_____
- इतर: ₹_____





**निधीची उपलब्धता:**

- स्वतःचा निधी: ₹_____
- बँकेकडून कर्ज: ₹_____ (कर्जाचा प्रकार व बँकेचे नाव)
- शासकीय योजना/अनुदान: _____

# 🌱माझा शेती संकल्प (उदा.) 🌱

**अपेक्षित उत्पादन आणि उत्पन्नः**

🌾 प्रति एकर अपेक्षित उत्पादनः _____ क्विंटल/टन

💵 एकूण उत्पन्नः ₹_____ (बाजारभाव ₹_____ प्रति क्विंटल)

📈 नफा किंवा तोटा अंदाजः ₹_____

**विशेष संकल्पः**

📌 शेतीतील नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा अवलंब (उदा. ठिबक सिंचन, मल्चिंग, सेंद्रिय/नैसर्गिक शेती)

📌 कर्जमुक्त शेतीसाठी उपाययोजना

📌 रासायनिक खतांचा कमी वापर

📌 हरित व शाश्वत शेतीसाठी विशेष पावले

📌 साठवणूक व विक्री व्यवस्थापनाचे नियोजन







# शेतकऱ्यांचा संकल्प - आपल्या सहकार्याची गरज!

🗣 **वर्ड ऑफ माऊथ:** आपल्या ओळखीतील शेतकऱ्यांपर्यंत स्पर्धेची माहिती पोहोचवा.

✍ **संकल्प लिहिण्यास मदत:** शेतकऱ्यांना संकल्प लिहिताना मार्गदर्शन करा.

🎁 **बक्षिसांचे प्रायोजकत्व:** पारितोषिकांसाठी आर्थिक वा वस्तुरूपात मदत करा.

💰 **देणगी स्वरूपात सहकार्य:** स्पर्धेच्या आयोजनासाठी आर्थिक पाठबळ द्या.

📲 **सोशल मीडियावर पोस्ट :** स्पर्धेची लिंक आणि माहिती जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवा.





# सूचना आणि संपर्क माहिती

- स्पर्धेशी संबंधित महत्त्वाच्या सूचना ग्रामसेतू ॲपमधील इंट्रो व्हिडिओद्वारे वेळोवेळी दिल्या जातील.
- स्पर्धेतील पुढील टप्पे, नियम आणि अपडेट्ससाठी ग्रामसेतू ॲपवर लक्ष ठेवा.
- ग्रामसेतू ॲपद्वारे थेट तिफण फाउंडेशनशी संपर्क साधून अधिक माहिती मिळवा.
- अटी व शर्ती लागु असतील.
- अंतीम निर्णय तिफण फौडेशन चा असेल.







## Get In Touch With Us!

9881907000, 8275201808

tifanfoundation@gmail.com

https://phygitalkrishi.com/

Raje Complex, Opp Tahsil, Shevgaon
Dist Ahilyanagar-414502 (MH)